सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११९ ठ. क्र. १६९ दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेचे कर्मचारी श्री. मधुकर चंद्रशेखर अंकम राहणार घ.नं. १७७६ गिरी झोपडपट्टी, दत्त नगर सोलापूर येथील रहिवासी सोलापूर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात चावीवाला म्हणून कार्यरत असताना दि. १०-५-२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता राघवेंद्र टॉवर जुना कुंभारी नाका येथील अय्यंगार बेंगलोर बेकरी समोर उन्हाच्या तीव्रतेमुळे आकस्मितपणे मुर्छा येऊन फिट्स आले. त्या दरम्याने नजीकच्या लोकांनी त्यांना श्री. छत्रपती सर्वोपचार शासकीय रुग्णालय येथे तात्काळ उपचारासाठी दाखल केले. उपचारा दरम्याने दि. ११-५-२०१६ रोजी पहाटे त्यांचे अकाली निधन झाले. तरी त्यांचे कुटूंबातील तिन्ही मुलींची उदरनिर्वाह व कुटूंबाची सर्व जबाबदारी कर्ता म्हणून श्री. मधुकर च. अंकम यांच्यावर होता. त्यांचे निधन झाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती खूप गंभीर व उदरनिर्वाहसाठी कोणतेही साधन नसल्याने आपल्या महानगरपालिकेच्या वतीने त्यांना जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १३२ ठ. क्र. १७०
दि. ०५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. क्रमांक
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकेत आरोग्याधिकारी पद रिक्त आहे. सदर पदावर म.न.पा.चे आरोग्याधिकारी या पदाचे शैक्षणिक अर्हता धारण करणारे अधिकारी डॉ. जयंती आडकी हे डी.पी.एच. आहेत. व सन १९९७ पासून मनपाच्या वैद्यकीय सेवेत कार्यरत आहेत. तसेच ते २००६ पासून प्रभारी आरोग्याधिकारी म्हणून वेळोवेळी कामकाज केलेले आहेत. व सध्याही त्याच पदावर कार्य करत असून त्यांची त्याच रिक्त पदावर आरोग्याधिकारी म्हणून कायम नियुक्ती करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या सहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९३५ ठ. क्र. ९६९
दि. ०५/१०/१८ ....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील प्र.क्र. २२ ब मध्ये दाजी पेठ परिसरात असलेल्या बालोद्यानाला **स्वातंत्र्य सैनिक मार्कंडेय बल्ला** असे नामकरण करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~प्राथमिक~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. १२४ ठ. क्र. ९७२ दि. ५/१०/१६ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/~~सर्वानुमते~~ पास झाला.



प्र.क्र. २१ मधील कर्णिक नगर परिसरात टी.पी.१/२८ भूखंड क्र. ५/१५ चिल्ड्रन पार्क याठिकाणी ३D/४D थिएटर उभे करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर शहरातील चिल्ड्रन पार्कचे एकूण क्षेत्रफळ ३३६० चौ. मी. इतके आहे. सदर ठिकाणी ३D/४D थिएटर बांधलेस त्याचा उपयोग शहरातील सर्व बालगोपालांना मनोरंजनाकरिता होणार आहे. तसेच अशा प्रकारे मनोरंजनाची सोय सोलापूर शहरात कोणत्याही उद्यानात नसलेने हा एक नाविण्यपूर्ण प्रोजेक्ट संपन्न होणार आहे. साधारणपणे सदर ३D/४D थिएटर मधील सर्व आवश्यक साधना करिता अंदाजे र.रु. २.०० कोटी व थिएटर बांधणेस आवश्यक असलेले सिव्हील वर्क करिता र.रु. ५०.०० लाख तसेच विशिष्ठ स्वरुपाची मुव्हीज घेणेचे असेल तर अंदाजे र.रु. ४५.०० लाख इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा अपेक्षित खर्च पाहता सदर काम शासकीय निधीतून करणेकरिता शासन स्तरावर पाठपुरावा केलेस या कामासाठी निधी उलब्ध होवू शकेल किंवा सदरच काम बांधा-वापरा-हस्तांतरीत करा (बीओटी) योजनेतून केलेस महानगरपालिकेचा मोठया प्रमाणात खर्च वाचून मनपाचे उत्पन्न काही प्रमाणात त्यातून वाढणेस मदत होईल आणि ही बाब प्रामुख्याने मूद करणेत येते की बागेची मालकी ही महानगरपालिकेची राहणार असून फक्त ३D/४D थिएटरकरिता बीओटी योजना राबविणेचे आहे.

प्रस्तावात नमूद वस्तुस्थितीचा साकल्याने विचार होवून प्र.क्र. २१ मधील चिल्ड्रन पार्कमध्ये ३D/४D थिएटर शासकीय निधीतून किंवा बीओटी तत्वावर उभे करणेस मा. उद्यान समितीची मंजूरी मिळून सदर धोरणास मा. मनपा सर्वसाधारण सभेची सक्षम मंजूर मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. १२-७-१६ चे टिपणीने आलेल्या प्रकरणी मा.म.न.पा.सर्वसाधारण सभेकडे धोरणात्मक मान्यता मिळणेस्तव मा. मंडया नि उद्यान समिती ठराव क्र. ०४, दिनांक १६-७-२०१६ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका